email
1:30 pm
22/12/2022

महाराष्ट्र वन विभाग
☎:022-28692668/ 28692596
apccfwlmumbai@mahaforest.gov.in

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
वन्यजीव पश्चिम प्रदेश मुंबई
जुनी एम.एच.बी. कॉलनी, एल.टी.रोड, बोरीवली (पश्चिम),
मुंबई - 400091

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्र. कक्ष-3/जमीन/NBWL/प्र.क्र.190/ 839 /2022-23 दिनांक - 22 डिसेंबर 2022.

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),

महाराष्ट्र राज्य, नागपूर

विषय :- **Diversion of Forest Land proposed Third Railway Line between Kalyan to Kasara Stations of 67.62 km in Ulhasnagar, kalyan and Sahapur Talukas in Thane district. NBWL Proposal.**

संदर्भ :- 1) उपवनसंरक्षक (वन्यजीव), ठाणे यांचेकडील पत्र जा.क्र.कक्ष-4/जमीन/NBWL /824,दिनांक 25/11/2022
2) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.कक्ष-3/जमीन/NBWL/प्र.क्र.190/2280, दि. 30/11/2022
3) उपवनसंरक्षक (वन्यजीव), ठाणे यांचेकडील पत्र जा.क्र.कक्ष-4/जमीन/NBWL /893,दिनांक 20/12/2022

मा. सर्वोच्च न्यायालयातील रिट याचिका (सिव्हिल) क्र. ४६०/२००४ मध्ये दि. ०४/१२/२००६ चे आदेशान्वये ज्या प्रकल्पास पर्यावरण (संरक्षण) अधिनियमातंर्गत पर्यावरणीय मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तावित क्षेत्र अभयारण्य / राष्ट्रीय उद्यानाच्या १० कि.मी च्या आत आहे, किंवा प्रस्तावित पर्यावरण संवेदनशील क्षेत्राच्या आत येत असेल, अशा प्रकल्पास राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. राष्ट्रीय उद्यान / अभयारण्य क्षेत्रात वनेत्तर काम करण्यासाठी भारत सरकार, पर्यावरण व वन मंत्रालय, यांचे पत्र क्र.F.No.6-10/2011 WL,दि.१९/१२/२०१२ अन्वये मार्गदर्शक सूचनाही निर्गमित केलेल्या आहेत.

2.00 त्याअनुषंगाने उप मुख्य अभियंता, (C) घाटकोपर, मध्य रेल्वे, घाटकोपर, मुंबई यांचा Diversion of Forest Land proposed Third Railway Line between Kalyan to Kasara Stations of 67.62 km in Ulhasnagar, kalyan and Sahapur Talukas in Thane district. NBWL Proposal बावतचा प्रस्ताव राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता प्राप्त होणेकरीता उपवनसंरक्षक (वन्यजीव), ठाणे यांनी संदर्भीय पत्र क्र. 1 अन्वये या कार्यालयास सादर केला होता. सदरचे प्रस्तावात संदर्भीय पत्र क्र. 2 अन्वये या कार्यालयाकडून आक्षेप नोंविण्यात आले होते. त्याअनुषंगाने संदर्भीय पत्र क्र. 3 अन्वये उपवनसंरक्षक (वन्यजीव), ठाणे यांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांची पुर्तता करुन सुधारीत प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे.

कृ.मा.प

3.00 सदर प्रस्तावात या कार्यालयाकडील Annexure-II व Part-IV चा समावेश करून प्रस्तावाच्या 5 प्रती पुढील कार्यवाहीसाठी सोबत सादर करण्यात येत आहेत. तरी त्यास राज्य / राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करणे करीता पुढील प्रचालन होणेस विनंती आहे.

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

( डॉ. व्ही. क्लेमेंट बेन )
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
वन्यजीव पश्चिम प्रदेश
मुंबई

प्रत :- उप वनसंरक्षक (वन्यजीव) ठाणे यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
प्रत :- उप मुख्य अभियंता, (C) घाटकोपर, मध्य रेल्वे, घाटकोपर, मुंबई यांना माहितीसाठी.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई यांचे कार्यालय
क्र.क्र. ______ आवक क्र. ______
4464
21 DEC 2022 21/12/22
प्रशासकिय अधिकारी अ.प्र.मु.व.सं.(व.जी.)प. मुंबई

महाराष्ट्र वन विभाग

# उप वनसंरक्षक, (वन्यजीव) ठाणे यांचे कार्यालय


एल.बी.एस मार्ग, तीन हात नाका, नौपाडा, ठाणे (प) 400 602

दूरध्वनी नं. 022 2540 2522 ईमेल : dcfwlthane@gmail.com, cfwlthane@mahaforest.gov.in


जा.क्र.कक्ष-4/जमीन/NBWL/ 893 /2022-23 ठाणे 400 602, दिनांक. 20 / 12 /2022

**पत्र**

प्रति,

मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
(वन्यजीव) पश्चिम मुंबई

विषय : Diversion of Forest land for proposed Third Railway Line between Kalyan to Kasara Stations of 67.62 km in Ulhasnagar, Kalyan & Sahapur Talukas in Thane district.
**NBWL Praposal**

संदर्भ : 1. उप मुख्य अभियंता, (C) घाटकोपर, मध्य रेल्वे, घाटकोपर, मुंबई यांचे कार्यालयाकडील पत्र क्रमांक Dy.CE/GC/41/Forest Land/ 41 दिनांक 21/11/2022. प्रस्ताव क्रमांक FP/MH/RAIL/41780/2019.
2. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-4/जमीन/NBWL/ 824 / 2022-23 दिनांक 25/11/2022.
3. आपले कार्यालयाकडील पत्र क्रमांक कक्ष-3/जमीन/NBWL/प्र.क्र.190/2280/2022-23 दिनांक 30/11/2022.
4. उप मुख्य अभियंता, (C) घाटकोपर, मध्य रेल्वे, घाटकोपर, मुंबई यांचे कार्यालयाकडील पत्र क्रमांक Dy.CE/GC/41/Forest Land/ दिनांक 16/12/2022.

उप मुख्य अभियंता, (C) घाटकोपर, मध्य रेल्वे, घाटकोपर, मुंबई यांनी विषयांकीत बाबतचा राष्ट्रीय वन्यजीव मंडळ (NBWL) अंतर्गत परवानगी मिळणेकामी प्रस्ताव संदर्भिय पत्र क्रमांक 1. अन्वये या कार्यालयाकडे हार्ड कॉपीमध्ये सादर केलेला होता. या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक 2. अन्वये सदरहू प्रस्ताव राष्ट्रीय वन्यजीव मंडळ (NBWL) अंतर्गत परवानगी मिळणेकामी आपले कार्यालयाकडे सादर करणेत आला होता.

आपले कार्यालयाकडील संदर्भिय पत्र क्रमांक 3. अन्वये विषयांकीत सादर केलेल्या प्रस्तावामध्ये त्रुटी असले बाबत कळवून, सदर नोंदविलेल्या त्रुटींची / अभिप्रायांची पुर्तता करुन सुधारीत प्रस्ताव फेरसादर करणे बाबत सुचना देण्यात आलेल्या होत्या. त्यानुषंगाने प्रकल्प यंत्रणेने त्यांचेकडील संदर्भिय पत्र क्रमांक 4. अन्वये उपस्थित केलेल्या आक्षेपांची पुर्तता करुन, सुधारीत प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे.

त्यानुषंगाने प्रकल्प यंत्रणेमार्फत हार्ड कॉपीमध्ये सादर केलेल्या प्रस्तावाचे संस्करण करुन सदरहू सुधारीत प्रस्तावास राष्ट्रीय वन्यजीव मंडळ (NBWL) अंतर्गत परवानगी मिळणेकामी विषयांकीत बाबतचा प्रस्ताव 6 प्रतिंमध्ये सोबत सादर करण्यात आलेला आहे. कृपया अवलोकन होणेस विनंती.

(श्रीम.एस.एम.गवस)
उप वनसंरक्षक
(वन्यजीव) ठाणे

सहपत्र : वरीलप्रमाणे.

प्रतिलीपी : मा. मुख्य वनसंरक्षक, (प्रादेशिक) ठाणे यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.
प्रतिलीपी : उप वनसंरक्षक, (प्रादेशिक) शहापूर यांचेकडे माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रतिलीपी : उप वनसंरक्षक, (प्रादेशिक) ठाणे यांचेकडे माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

E/suhas land data/NBWL/NBWL letters